AC – 20/05/2025

Item No. – 5.50 (N) Sem-IV 4(d)

**As Per NEP 2020**

# University of Mumbai

| | |
|---|---|
| **Syllabus for**<br>**Basket of Marathi OE** | |
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG Second Year Programme** | |
| **Semester** | **IV** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **ग्रंथ प्रकाशन व्यवहार** | **4** |
| **From the Academic Year** | **2025-26** |

# Syllabus
# B.A. (Marathi - OE)
# (Semester - III)

## Title of Paper : ग्रंथ प्रकाशन व्यवहार

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे वर्णन**<br>**(Description of the Course)** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० चे आंतरविद्याशाखीय उद्दिष्ट लक्षात घेऊन, **मुक्त वैकल्पिक (Open Elective)** या स्तंभांतर्गत **चौथ्या सत्रासाठी** मराठी विषयाची **'ग्रंथ प्रकाशन व्यवहार' (श्रेयांकने ४)** ही अभ्यासपत्रिका अध्ययनासाठी उपलब्ध आहे. **फक्त M1-M2-M3** या प्रारूपांतर्गत मानव्य विद्याशाखेतील सामाजिक शास्त्राचे विद्यार्थी आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी यांनी सदर अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करणे अपेक्षित आहे.<br>इतर अभ्यासपत्रिकांप्रमाणे प्रस्तुत अभ्यासपत्रिका साहित्यकेंद्री नसून बाजाराव्यवस्थेतील विक्रीयोग्य वस्तू म्हणून ग्रंथांचा विचार करणे येथे अभिप्रेत आहे. ग्रंथ निर्मितीचा व्यवसाय आणि त्याची विविध अंगे, ग्रंथाच्या निर्मितीपासून त्याच्या विक्रीपर्यंतचे विविध टप्पे, यांचा परिचय करून देणे, असे प्रस्तुत अभ्यासपत्रिकेचे स्वरूप आहे. विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथनिर्मितीविषयी व्यावसायिक दृष्टिकोन रुजावा हे लक्षात घेऊन या अभ्यासपत्रिकेची रचना केली आहे. |
| 2 | **Vertical :** | OE |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit :** | 4 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 60 Hours |
| 6 | **Marks Allotted :** | 100 Marks |
| 7 | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. ग्रंथ प्रकाशन व्यवसायाचे स्वरूप व या व्यवसायाशी निगडित कायद्यांचा परिचय करून देणे.<br>२. ग्रंथ प्रकाशनाच्या एकंदर व्यवहारातील प्रकाशन संस्थेचे महत्त्व आणि ग्रंथ प्रसिद्धीकरणाच्या विविध बाजू यांचा परिचय करून देणे.<br>३. प्रत्यक्ष ग्रंथ निर्मितीची प्रक्रिया, तिच्या विविध अंगांसह स्पष्ट करणे.<br>४. ग्रंथप्रसार व विक्री यांच्यासाठी आवश्यक उपक्रम व साखळीचा परिचय करून देणे. | |

| | |
|---|---|
| | |
| 8 | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course Outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना ग्रंथ प्रकाशन व्यवसायाचे स्वरूप व या व्यवसायाशी निगडित कायद्यांचा परिचय होईल.<br>२. विद्यार्थ्यांना ग्रंथ प्रकाशनाच्या एकंदर व्यवहारातील प्रकाशन संस्थेचे महत्त्व आणि ग्रंथांच्या प्रसिद्धीकरणाच्या विविध बाजूंचा परिचय होईल.<br>३. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथ निर्मितीची प्रक्रिया, तिच्या विविध अंगांसह स्पष्ट होईल.<br>४. विद्यार्थ्यांना ग्रंथप्रसार व विक्री यांच्यासाठी आवश्यक उपक्रम व साखळीचा परिचय होईल. |
| 9 | **अभ्यास घटक (Modules) :** |
| | **घटक - १ : ग्रंथ प्रकाशन : एक व्यवसाय (भाग १ )** |
| | अ) १. ग्रंथ प्रकाशन व्यवसायाचे स्वरूप<br>२. ग्रंथ प्रकाशन व्यवसायाची व्याप्ती<br>आ) १. भारतीय ग्रंथ संरक्षण कायदा - १८६७<br>२. लेखकाचा स्वामित्वहक्क<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन - १) |
| | **घटक - २ : ग्रंथ प्रकाशन : एक व्यवसाय (भाग २ )** |
| | अ) १. ग्रंथ प्रकाशन व्यवसायाचे प्रमुख घटक : लेखक, प्रकाशक, मुद्रक, वितरक व ग्राहक<br>२. ग्रंथ व्यवहारातील प्रकाशन संस्थेची मध्यवर्ती भूमिका<br>आ) १. ग्रंथांची विविध माध्यम-रूपे [कागदी पुस्तक, ई-पुस्तक व श्राव्य पुस्तक (ऑडियो बुक)]<br>२. प्रकाशनासाठी स्वीकारलेल्या ग्रंथांचे प्रकार (स्वतंत्र ग्रंथ, संपादित/संकलित ग्रंथ, भाषांतरित ग्रंथ व मुद्रणपूर्व काळातील हस्तलिखिते)<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन -१) |
| | **घटक - ३ : प्रत्यक्ष ग्रंथनिर्मिती** |
| | अ) १. ग्रंथ संहिता निवड व ग्रंथ संहितेचे संपादन (आशय संपादन व भाषिक संपादन)<br>२. अक्षर जुळणी व मुद्रितशोधन<br>आ) १. ग्रंथ घटक व त्यांची मांडणी (मुखपृष्ठ, शीर्षकपृष्ठ, प्रकाशनविषयक तपशील, श्रेय नामावली, अर्पणपत्रिका, अनुक्रमणिका, प्रस्तावना/मनोगत, मुख्य संहिता, टिपा/तळटिपा, आकृत्या, तक्ते, नकाशे, आलेख, चित्रे, छायाचित्रे, विषयसूची, नामसूची, परिशिष्टे, संदर्भसूची, ब्लर्ब, अंत्यपृष्ठ)<br>२. प्रत्यक्ष मुद्रण व ग्रंथ बांधणी<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन -१) |
| | **घटक - ४ : ग्रंथ वितरण व विक्री** |
| | अ) १. ग्रंथाची प्रसिद्धी व जाहिरात<br>२. ग्रंथ वितरणाची क्षेत्रे (व्यक्तिगत ग्राहक, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था) |

| | |
|---|---|
| | आ) १. ग्रंथ विक्रीची साखळी (प्रकाशक-मुख्य वितरक/दुय्यम वितरक- किरकोळ विक्रेते, ग्राहक)<br>२. ग्रंथ विक्रीच्या विविध पद्धती (प्रसिद्धीपूर्व सवलत योजना, प्रत्यक्ष विक्री केंद्रे, समाजमाध्यमांद्वारे विक्री (फेसबुक, इन्स्टाग्राम), ऑनलाईन विक्री केंद्रे (फ्लिपकार्ट, अमेझॉन, बुकगंगा)<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन -१) |
| **10** | **पाठ्य ग्रंथ (Text Books) : N.A.** |
| **11** | **संदर्भ ग्रंथ (Reference Books) :**<br>१. *पॉप्युलर रीतिपुस्तक,* रामदास भटकळ , मृदुला जोशी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२०१५.<br>२. *प्रकाशन व्यवसाय परिचय*, शरद गोगटे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९९.<br>३. *संपादन : स्वरूप व कौशल्ये,* शरद गोगटे, य० च० म० मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००३.<br>४. *भारतीय ग्रंथ संरक्षण कायदा १८६७ आणि त्याचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव*, अ० का० प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, दुसरी आवृत्ती - २०१८.<br>५. *मुद्रितशोधन*, य० ए० धायगुडे, दि पुना प्रेस ओनर्स असोसिएशन, पुणे, दुसरी आवृत्ती - १९७७.<br>६. *डेस्कटॉप पब्लिशिंग*, राजेंद्र मंत्री, अनुभव प्रकाशन, मुंबई, १९९७.<br>७. 'प्रकाशनक्षेत्रातील संपादकाची भूमिका' (लेखमाला), नागनाथ कोतापल्ले (संयोजक), *ललित*, २०१५ या वर्षातले सर्व अंक.<br>८. *The Chicago Manual of Style (16th Edition),* The University of Chicago Press, Chicago & London, 2010. |

| | | |
|---|---|---|
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination : 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |

| | |
|---|---|
| **13** | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) : ४० गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :**<br>चाचणी परीक्षा / प्रकल्पलेखन / मौखिक परीक्षा / नियतकार्य ( Assignment) / प्रश्नमंजूषा / सादरीकरण<br>उपरोक्त कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) |
| **14** | **बहिर्गत परीक्षा : ६० गुण (वेळ : दोन तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप (Format of Question Paper) :**<br>१. प्रत्येकी १५ गुणांचे **सहा** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी **चार** प्रश्नांची उत्तरे लिहावीत. पहिल्या **पाच** प्रश्नांपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. **सहावा** प्रश्न सोडविणे **अनिवार्य** आहे.<br>२. पहिले **चार** प्रश्न हे प्रत्येक घटकावर आधारलेले दीर्घोत्तरी स्वरूपाचे व अंतर्गत पर्याय देणारे असावेत.<br>३. प्रश्न क्रमांक **पाच** हा सर्व घटकांवर आधारित टिपांचा असावा. **चार**पैकी कोणत्याही **दोन** टिपा लिहाव्यात.<br>४. प्रश्न क्रमांक **सहा** हा **अनिवार्य** असून तो सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. या प्रश्नामध्ये प्रत्येक घटकावर **पाच** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी एकूण **वीस** वस्तुनिष्ठ प्रश्नांपैकी कोणत्याही **पंधरा** प्रश्नांची उत्तरे लिहावीत. |

| Sd/- | Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|---|
| **Sign of BOS Chairman**<br>**Dr. Satish Kamat**<br>**Board of Studies in Marathi** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Dr. Suchitra Naik**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Dr. Manisha Karne**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the Dean**<br>**Prof. Dr. Anil Singh**<br>**Faculty of Humanities** |